# जिल्हा निर्यात प्रचालन समिती (District Export Promotion Committee)
## दिनांक १८/०७/२०२४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठक दि. १८/०७/२०२४ रोजी दुपारी ३:०० वा. राजस्व सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग येथे मा.डॉ.रविंद्र शेवाळे, उपजिल्हाधिकारी,(सा.प्र) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीस खालील प्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पदनाम | कार्यालयाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | मा.डॉ. रविंद्र शेवाळे | उपजिल्हाधिकारी,(सा.प्र) | जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग |
| २ | श्री. जी.एस.हरळय्या | महाव्यवस्थापक | जिल्हा उद्योग केंद्र, रायगड-अलिबाग |
| ३ | श्री. विश्वजीत चिमणकर | सहाय्यक संचालक, | विदेश व्यापार महानिदेशालय, (DGFT) मुंबई |
| ४ | श्री. पांडुरंग आबा बामणे | व्यवस्थापक | अपेडा,मुंबई |
| ५ | श्री. विजयकुमार कुलकर्णी | जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक | बँक ऑफ इंडिया,अलिबाग |
| ६ | श्री. लक्ष्मण जाधव | संचालक | मे. जेसन पॉलिमर्स प्रा. लि. माणगांव |
| ७ | श्री. प्रणव झुंझारराव | वरीष्ठ सल्लागार, कोकण विभाग | EY, Mumbai |
| ८ | श्री. एस.एस. बिराजदार | व्यवस्थापक | जिल्हा उद्योग केंद्र, रायगड-अलिबाग |

महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, रायगड-अलिबाग यांनी प्रथम सर्व सदस्याचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात केली व दि.२२/०२/२०२४ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी देण्यात आली. डीजीसीआयएस या केंद्र शासनाच्या विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार रायगड जिल्हा निर्यातीत पाचव्या क्रमांकाचा जिल्हा असुन रायगड जिल्हयातून केमिकल्स, आर्यन्स, स्टील, फॉर्मासिटीकल्स, इंजिनिअरींग वस्तू इ. मोठ्या प्रमाणात निर्यात होत आहे. रायगड जिल्ह्यातून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात एकूण रु. ५१ हजार कोटीची निर्यात झालेली असून राज्याच्या एकूण निर्यातीत रायगड जिल्ह्याचा वाटा ७.५% इतका आहे. रायगड जिल्ह्यातून केमिकल, आयर्न स्टील, इंजिनिअरींग उत्पादने, सागरी उत्पादने इत्यादीची निर्यात मोठ्या प्रमाणावर युएसए, युएई, इटली, सिंगापूर इ. देशात मोठ्या प्रमाणावर होत असल्याने सादरीकरणाद्वारे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी उपस्थित सर्व सदस्यांना अवगत केले. मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षेतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समितीद्वारे जिल्ह्यातील सर्व महत्वाच्या उद्योग घटकाशी चर्चा करुन स्थानिक विशेष उत्पादने,एमएसएमई, एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत उत्पादने इत्यादीचा समावेश करुन निर्यात वाढी करीता जिल्हा निर्यात कृती आराखडा तयार करुन राबवित असल्याचे नमूद केले.

रायगड जिल्ह्यकरिता शासनाने कृषी उत्पादनात मरिन प्रोडक्ट व औद्योगिक उत्पादनात आयर्न स्टील या उत्पादनाचा समावेश एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) असल्याचे सांगितले. रायगड जिल्हयाला विस्तीर्ण असा सुमारे १२५ किमी चा सागरी किनारा असून त्यातून वार्षिक सुमारे ४२ हजार मे. टन इतका मत्स्य उत्पादन होत असून यावर प्रक्रिया करणारे उद्योग रायगड जिल्ह्यात अल्प प्रमाणात आहेत. जिल्हा निर्यात प्रचालन

समितीद्वारे जिल्हा उद्योग केंद्राकडून मत्स्य प्रक्रिया उद्योग वाढी करीता डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ अंतर्गत् पनवेल येथील खारलँड रिसर्च स्टेशन या संस्थेसोबत सामजंस्य करार (MoU)करणार असल्याचे सांगितले, खारलँड रिसर्च स्टेशन, पनवेल या संस्थेतील शास्त्रज्ञ डॉ. विवेक वर्तक यांच्या मार्गदर्शनाने उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत फिश प्रोसेसिंग या विषयावर रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन करुन सदर प्रशिक्षणात प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थीना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम इत्यादी योजनेच्या अंतर्गत प्रक्रिया उद्योग सुरु करण्याकरिता कर्ज प्रस्ताव शिफारस करण्यात आल्याचे मा. महाव्यवस्थापक यांनी नमूद केले.

पेण येथील सुप्रसिध्द गणपती मूर्ती उत्पादने यास भौगोलिक मानांकन प्राप्त झाले आहे. तसेच जिल्हा उद्योग केंद्रा मार्फत एमएसई-सिडीपी अंतर्गत पेण येथे गणपती क्लस्टर,हमरापूर व तळोजा इंजिनिअरींग क्लस्टर, तळोजा पनवेल व एमएसआय-सीडीपी अंतर्गत बांबू क्लस्टर,साळाव मुरुड येथे बांबू क्लस्टर स्थापित होत असल्याचे सांगितले.

जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, ईईपीसी, अॅपेडा, केमिक्सील इ. निर्यात प्रचालन संस्थेद्वारे रायगड जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रामध्ये गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी गुंतवणूकदार व व्यवसायांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी उद्योग विभागा मार्फत दि.०७/०३/२०२४ पनवेल येथे जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद संपन्न झाल्याचे महाव्यवस्थापक यांनी उपस्थितांना अवगत केले. सदर गुंतवणूक परिषदे मध्ये रायगड जिल्ह्यातील एकूण १७ उद्योगां समवेत सामंजस्य करार करण्यात आले असून त्यात सुमारे रु. २६कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन ३९८० इतकी रोजगार निर्मिती होणार असल्याचे महाव्यवस्थापक यांनी सांगितले.

महाराष्ट्र औद्योगिक धोरण -२०१३ पायाभूत सोयी-सुविधा निर्मिती अंतर्गत मे. जवाहर सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित,कामोठे ता. पनवेल या संस्थेस एक्सप्रेस फिडरकरीता १२.४४ कोटी व पनेवल इंडस्ट्रीयल को-ऑप. इस्टेट या संस्थेस रु. २२ कोटी रस्ता, ड्रेनेज, पथ दिवे व भूमिगत वायर इ.साठी शासना कडून मंजूरी प्राप्त असल्याचे महाव्यवस्थापक यांनी सांगितले.

त्यानंतर उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे महाव्यवस्थापक यांनी जाहीर केले.

महाव्यवस्थापक तथा
सदस्य सचिव जिल्हा निर्यात प्रचालन समिती,
रायगड-अलिबाग

उपजिल्हाधिकारी,(सा.प्र)
रायगड-अलिबाग